**सन २०२६-२७ मध्ये राष्ट्रीय कृषि विकास योजनेंर्गत जमीन आरोग्य व सुपिकता कार्यक्रम राबविण्यासाठी सर्वसाधारण व अनुसूचित जमाती या प्रवर्गांचा निधी वितरीत करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : कृवपदुम-१२०२७/५४/२०२६-MAG-1A**
संगणक क्रमांक :१६५८१५६
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, विस्तार, मुंबई- ४०००३२
दिनांक : २१ मे, २०२६

**वाचा :-**

१. केंद्र शासनाने https://soilhealth.dac.gov.in/files/Implementation.pdf या संकेतस्थळावर प्रसिद्ध केलेल्या राष्ट्रीय कृषि विकास अभियानांतर्गत मृद आरोग्य पत्रिका बाबतच्या मार्गदर्शक सूचना.
२. राष्ट्रीय कृषि विकास योजनेच्या राज्यस्तरीय प्रकल्प मंजूरी समितीच्या इतिवृत्तासंबंधी पत्र क्र. सीएसए-२०२६/प्र.क्र.१९/कार्यासन-२अे, दिनांक ११.०३.२०२६
३. वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि.०९.०४.२०२६
४. वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि.०७.०५.२०२६
५. आदिवासी विकास विभाग शासन परिपत्रक क्र. बीयुडी-२०२६/प्र.क्र.६१/कार्या-६, दि.१३.०५.२०२६
६. कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र. कृवपदुम १२०२७ /४२ /२०२६ -MAG-1A, दिनांक ०५.०५.२०२६ (प्रशासकीय मान्यता)
७. अवर सचिव (राकृवियो), कृषि व शेतकरी कल्याण विभाग, भारत सरकार यांचे पत्र क्र. १-१५/२०२६-RKVY-२११, दिनांक २७.०४.२०२६. (मदर सँक्शन)

**प्रस्तावना :-**

केंद्र शासनाने सन २०१४-१५ पासून राष्ट्रीय शाश्वत शेती अभियानांतर्गत जमीन आरोग्य पत्रिका वितरण कार्यक्रम सुरु केलेला आहे. सन २०१५-१६ पासून ही योजना केंद्र व राज्य हिस्सा ६०:४० या प्रमाणात राबविण्यात येत आहे. सदर योजनेचा समावेश सन २०२२-२३ पासून राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत करण्यात आला. त्यानुषंगाने सदर योजना सन २०२६-२७ मध्ये राबविण्यासाठी वाचा क्र.०६ येथील शासन निर्णयान्वये रु. ११८६.०० लक्ष च्या वार्षिक कृति आराखड्यास प्रशासकीय मान्यता दिली आहे.

केंद्र शासनाने संदर्भ क्र.७ येथील पत्रान्वये राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत जमीन आरोग्य व सुपिकता कार्यक्रम राबविण्यासाठी सन २०२६-२७ मध्ये पहिल्या हप्त्यापोटी सर्वसाधारण प्रवर्गासाठी केंद्र हिश्शाचा रु. २,४५,००,०००/- (रूपये दोन कोटी पंचेचाळीस लक्ष फक्त) व अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी केंद्र हिश्शाचा रु. २९,००,०००/- (रूपये एकोणतीस लक्ष फक्त) निधी उपलब्ध करून दिला आहे. सदर सर्वसाधारण व अनुसूचित जमाती या प्रवर्गाचा एकूण केंद्र हिश्शाचा निधी रू. २,७४,००,०००/- (रूपये दोन कोटी चौऱ्याहत्तर लक्ष फक्त) व त्याला समरुप राज्य हिस्सा रुपये १,८२,६६,६६६/-(रुपये एक कोटी ब्याऐंशी लक्ष सहासष्ट हजार सहाशे सहासष्ट फक्त) असा एकूण रु. ४,५६,६६,६६६/- (रुपये चार कोटी छप्पन लक्ष सहासष्ट हजार सहाशे सहासष्ट फक्त) निधी कृषि आयुक्तालयास वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u> :-**

सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत जमीन आरोग्य व सुपिकता कार्यक्रम राबविण्यासाठी सर्वसाधारण व अनुसूचित जमाती या प्रवर्गांचा एकूण केंद्र हिस्सा रू. २,७४,००,०००/- (रूपये दोन कोटी चौऱ्याहत्तर लक्ष फक्त) व त्यास समरूप राज्य हिस्सा रू. १,८२,६६,६६६/-(रुपये एक कोटी ब्याऐंशी लक्ष सहासष्ट हजार सहाशे सहासष्ट फक्त) असा एकूण रु. ४,५६,६६,६६६/- (रुपये चार कोटी छप्पन लक्ष सहासष्ट हजार सहाशे सहासष्ट फक्त) इतका निधी, सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पीत निधीमधून खाली नमूद केल्याप्रमाणे प्रवर्गनिहाय कृषी आयुक्तालयास वितरीत करण्यात येत आहे.

| | सर्वसाधारण | अनुसूचित जमाती | एकूण |
|---|---|---|---|
| **केंद्र हिस्सा** | २,४५,००,००० | २९,००,००० | २,७४,००,००० |
| **राज्य हिस्सा** | १,६३,३३,३३३ | १९,३३,३३३ | १,८२,६६,६६६ |
| **एकूण** | ४,०८,३३,३३३ | ४८,३३,३३३ | ४,५६,६६,६६६ |

२. सदर निधी प्रदान केलेल्या प्रशासकीय मान्यतेनुसार खर्च करण्यात येईल याची दक्षता घेण्यात यावी. या प्रित्यर्थ होणारा खर्च मंजूर होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात येऊन पुढील लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

| प्रवर्ग | **केंद्र हिस्सा लेखाशिर्ष** | **राज्य हिस्सा लेखाशिर्ष** |
|---|---|---|
| सर्वसाधारण | **<u>मागणी क्रमांक -डी-३</u>**<br>२४०२ मृद व जल संधारण<br>(००)(१०१) मृद सर्वेक्षण व चाचणी<br>(००) (१६) कृषि उन्नती योजना - मृद आरोग्य पत्रिका<br>केंद्र हिस्सा- ६०% (कार्यक्रम)<br>(२४०२ अे०४१)<br>३३- अर्थसहाय | **<u>मागणी क्रमांक -डी-३</u>**<br>२४०२ मृद व जल संधारण<br>(००)(१०१)मृद सर्वेक्षण व चाचणी<br>(००)(१७) कृषि उन्नती योजना- मृद आरोग्य पत्रिका<br>राज्य हिस्सा- ४०% (कार्यक्रम)<br>(२४०२ अे०५९)<br>३३- अर्थसहाय |
| अनुसूचित जमाती | **<u>मागणी क्रमांक -टी-५</u>**<br>२४०२ मृद व जल संधारण<br>(७९६), जनजाती क्षेत्र उपयोजना<br>(०१)(०२ ) कृषि उन्नती योजना - मृद आरोग्य पत्रिका<br>केंद्र हिस्सा- ६०% (कार्यक्रम)<br>(२४०२ अे०८६)<br>३३- अर्थसहाय | **<u>मागणी क्रमांक -टी-५</u>**<br>२४०२ मृद व जल संधारण<br>(७९६), जनजाती क्षेत्र उपयोजना<br>(०१)(०३) कृषि उन्नती योजना - मृद आरोग्य पत्रिका<br>राज्य हिस्सा- ४०% (कार्यक्रम)<br>(२४०२ अे०९५)<br>३३- अर्थसहाय |

३. सदर योजना राबविताना खालील अटी व शर्तीचे पालन करण्यात यावे.

१) सदर योजना केंद्र शासनाच्या संदर्भाधीन मार्गदर्शक सूचनांनुसार व केंद्र व राज्य शासनाच्या वेळोवेळी दिल्या जाणाऱ्या निधी वितरीत करण्याच्या अटी व शर्तीनुसार राबविण्यात यावी.

२) खर्चाचे लेखे सुव्यवस्थित ठेवुन सदर खर्चाचे लेखा परीक्षण अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्रे केंद्र व राज्य शासनाला लवकरात लवकर प्रगती अहवालासह सादर करण्यात यावेत.

३) योजनेच्या वेगवेगळ्या बाबींवरील भौतिक व आर्थिक प्रगती अहवाल केंद्र व राज्य शासनास प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत सादर करण्यात यावा.

४) योजनेशी संबंधित ताळेबंद व लेखापरिक्षण जमा खर्चाच्या रकमा यांचा अहवाल अंमलबजावणी यंत्रणेने द्यावा. त्यामध्ये वर्षाच्या सुरुवातील अखर्चित रकमा व व्याजाद्वारे मिळालेले उत्पन्न स्पष्टपणे नमूद करण्यात यावे. जेणेकरून पारदर्शी स्वरुपात रकमा विचारात घेता येईल व सदिंग्धता राहणार नाही.

५) कोणत्याही परिस्थितीत मंजूर कार्यक्रमापेक्षा जास्तीचा कार्यक्रम राबविला जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

६) सदर योजनेकरीता मंजूर झालेला निधी हा ज्या संवर्गासाठी मंजूर केलेला आहे त्याच संवर्गासाठी खर्च होईल याची दक्षता घेण्यात यावी.

७) संदर्भाधीन क्र. ७ येथील केंद्र शासनाच्या पत्रात नमूद केलेल्या सूचनांचे पालन करण्यात यावे

८) वित्त विभागाच्या संदर्भ क्र. ३ येथील परिपत्रकातील अटींचे पालन करण्यात यावे. तसेच सदर परिपत्रकासोबतच्या परिशिष्टातील अ. क्र. ९ येथे नमूद बाबींची पूर्तता करण्यात यावी.

४. सदर योजनेकरीता आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना योजनेचे नियंत्रण अधिकारी म्हणून व त्यांच्या कार्यालयातील सहायक संचालक, लेखा यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५. सदर निधी खर्च करतांना विहित कार्यपध्दती अनुसरुन सर्व वित्तीय कायदे/ टेंडर नियामावली व नियमांचे/ प्रक्रियेचे/वित्तीय अधिकारांच्या मर्यादेत/P.W.D. म्यॅनूअलच्या अधिन राहून/C.V.C.तत्वानुसार/CAG च्या निर्देशानुसार/प्रचलित शासन निर्णय/नियम/परिपत्रक/ तरतुदीनुसार, बजेट व कोषागार नियमावलीनुसार खर्च करण्याची कार्यवाही अंमलबजावणी यंत्रणांनी करावी. कोणत्याही परिस्थितीत कुठलाही शासन निर्णय/ अधिकाराचा भंग होणार नाही, याबाबत दक्षता घेण्याची जबाबदारी संबंधित क्षेत्रिय कार्यालयाची राहिल.

६. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२५/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि.०७.०५.२०२६ व आदिवासी विकास विभाग शासन परिपत्रक क्र. बीयुडी-२०२६/प्र.क्र.६१/कार्यासन-०६, दि.१३.०५.२०२६ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक २०२६०५२१११११८५५७७०१ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

SUHAS MADHUSUDAN SAKPAL

Digitally signed by SUHAS MADHUSUDAN SAKPAL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=AGRICULTURE AND ADF DEPARTMENT, 2.5.4.20=01592dd98f36fbc924826517361a31b8166fce7745d35b95fa79159b8fb74478, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=82434617B1F4C6035B3CC29788B8D394A52FB3EDABFC26B4E85EBC2AF7C45FF9, cn=SUHAS MADHUSUDAN SAKPAL
Date: 2026.05.21 11:19:49 +05'30'

**( सुहास सकपाळ )**

**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

२. मा. राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

३. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई

४. मा. सचिव (कृषि) यांचे स्वीय सहायक, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.

५. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
६. संचालक (निविष्ठा व गुणनियंत्रण), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर .
८. सर्व कृषि संचालक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
९. सर्व विभागीय कृषि सहसंचालक.
१०. सर्व प्रकल्प संचालक, आत्मा.
११. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
१२. सहाय्यक संचालक, लेखा -१, कृषि आयुक्तालय महाराष्ट्र राज्य, पुणे.
१३. कार्यासन १४३१, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. वित्त विभाग (व्यय-१), मंत्रालय, मुंबई.
१५. निवडनस्ती (कार्यासन १-अे), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.